FORM-1A Seen 25/9/21 N.C.R.B.

I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154147

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र State, जिल्हा बृहन्मुंबई District, पोलीस ठाणे लाप्रवि मुंबई Police Station, पहिली खबर क्र. 39 FIR No., वर्ष 2021 Year, दिनांक 25/09/2021 Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. 1988, कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ..........., कलमे Sections ...........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...........

3. (a) अपराधाची घटना : वार शुक्रवार, तारीख पासून 24/09/2021 वेळ 16:52, तारीख पर्यंत 24/09/2021 19:07 वा. चे दरम्यान
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख 24/09/2021, वेळ ...........
   Information received at P. S. Date, Time
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 02/2021, तारीख 25/09/2021 वेळ 07.00 वा
   General Diary Reference : Entry No., Date, Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लाचेसंदर्भात, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..........., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव, ठिकाणाचे नंबर, गल्ली, रस्त्याचे नाव — मालमत्ता कक्ष, गु.प्र.शा., गु.अ.वि., वाहतुक प्रशिक्षण स्मारक, 3 रा माळा, हंसराज लेन, भायखळा, पो.स्टे. च्या बाजूला, भायखळा (पूर्व) मुंबई.
   Address of Occurrence Name, No. if any, Ward, Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ..........., गाव, पोस्ट, तालुका, जिल्हा, राज्य
   Nearest identifiable place, Village, Post, Taluka, Dist., State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ..........., तालुका ..........., जिल्हा ..........., राज्य ...........
   In case, outside the limit of this Police Station, Taluka, Dist., State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name सौ. सुनिता स्वामी (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name राघवेंद्र स्वामी
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 36 (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. 8668969411
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ..........., दिल्याचा दिनांक Date of Issue ..........., दिल्याचे ठिकाण Place of Issue ..........., (f) व्यवसाय Occupation खाजगी
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ..........., जनजात Sub-Caste ...........
   (h) पत्ता Address ..........., गल्ली / सर्व्हे नं. Ward ..........., घर / नाव नं. House/Name No. ..........., फोन / मो. नं. Phone/Mo. No. ..........., पॅन नं. PAN No. ..........., वोटर्स नं. Card No. ...........
   रस्त्याचे नाव Road फ्लॅट नं 605, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place सी-स्टार बिल्डींग, गाव Village से-5, पोस्ट Post उल्वे, पो. स्टे. P. Stn. नवी मुंबई.
   तालुका Taluka ..........., जिल्हा Dist. ..........., राज्य State ..........., सध्याचा पत्ता Present Address ...........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

अटक आरोपी लोकसेवक :- नागेश अंबादास पुराणिक, हिं/45 वर्षे, हुद्दा :- सपोनि, मालमत्ता कक्ष, गुप्रशा, गुअवि, भायखळा, मुंबई. राहणार :- बि. नं 54, रुम नं. 4, वरळी पोलीस कॅम्प, वरळी, मुंबई - 30

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

फिर्यादी जबाब                दि:- 25/09/2021

यातील कॉ.क्र. 6 मधील तक्रारदार यांचा स्वतंत्र पानावरती संगणकावर टंकलिखित केलेला, मराठीमधील जबाब हाच नमूद गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(सही)
25/09/2021

(अमोल शिंदे)
पोलिस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई विभाग.

(सही)
25/9/21

फिर्याद दिनांक २५/०९/२०२१

श्रीमती सुनिता राघवेंद्र स्वामी, वय ३६ वर्षे, धंदा–गृहिणी रा.ठि. – ६०५, मी स्टार बिल्डींग, सेक्टर ५, उलवे, नवी मुंबई. मो.क्र. ८६६८९६९४११

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर मागील पाच महिन्यांपासून माझे कुटुंबासह रहात आहे. मी गृहिणी असुन, माझे पतीचा 'नशा' या नावाने नवी मुंबई येथे पब व रेस्टॉरंट चा व्यवसाय असुन त्यापासुन मिळणाऱ्या उत्पन्नावर आमचा उदरनिर्वाह चालतो.

माझे पती श्री. राघवेंद्र स्वामी यांना प्रॉपर्टी सेल क्राईम ब्रँच, भायखळा, मुंबई चे पोलीस अधिकारी सचिन कदम आणि पुराणिक यांनी दिनांक २१/०९/२०२१ रोजी रात्रौ. सुमारे २२.३० वाजता बी.एम.डब्ल्यु ५३० डी या वाहन चोरीच्या संबंधाने चौकशीकामी वाशी, नवी मुंबई येथुन नेले होते. त्यावेळी तेथुन माझ्या पतीने मला रात्रौ. फोनव्दारे कळविले की, जतिन आहुजा या आरोपीने बी.एम.डब्ल्यु कार दिल्ली येथुन चोरून त्यांच्या मार्फतीने आमचा कौटुंबिक मित्र वाय. श्रीतेजा राहणार हैद्राबाद यास विक्री केली आहे. नमुद बी.एम.डब्लू वाहन पोलीसांना तात्काळ पाहिजे आहे. म्हणुन मी दिनांक २१/०९/२०२१ रोजी रात्रौ श्री. वाय. श्रीतेजा यास फोन करून सदर बी.एम.डब्ल्यु कार मुंबईला घेवून येण्याचे कळविले. माझ्या पतीने सुध्दा त्यांना फोन केला होता. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मी दिनांक २२/०९/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता स्वतः प्रॉपर्टी सेल, क्राईम ब्रांच, भायखळा, मुंबई येथे जावून समक्ष माझ्या पतीसोबत आणि पोलीस अधिकारी श्री. पुराणिक यांचेसह जावून चर्चा केली असता श्री. पुराणिक साहेबांनी मला सांगितले की, 'जोपर्यंत गाडी येणार नाही. तोपर्यंत आम्ही तुझ्या पतीला सोडणार नाही. म्हणुन मी १२.३० वा. घरी परतले. त्याच दिवशी रात्रौ. २३.०० वाजताचे सुमारास श्रीतेजा माझ्या पतीच्या सुचनेनुसार बी.एम.डब्ल्यु कार क्र. एच.आर. २६ सीएच ७००२ सह प्रॉपर्टी सेल क्राईम ब्रांच, भायखळा, मुंबई येथे घेवुन पोहचला. त्याचवेळी मी देखील तेथे पोहचले. तेंव्हा आम्ही तीघांनी पुराणिक साहेबांसोबत चर्चा केली असता. त्यांनी मला सांगितले की, आता उशिर झाला आहे. साहेब घरी गेले आहेत. उद्या सकाळी साहेबांशी चर्चा करून दोघांना सोडुन देतो तुम्ही घरी जा उद्या सकाळी या असे सांगितले म्हणुन मी घरी गेले.

त्यानंतर दिनांक २३/०९/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता मी प्रॉपर्टी सेल, क्राईम ब्रांच, भायखळा, मुंबई येथे गेले. त्यावेळी पुराणिक साहेब यांनी आम्हा तीघांसह चर्चा करून सांगितले की, बी.एम.डब्ल्यु कार दिल्ली येथुन जतिन आहुजा याने चोरली असुन तो मोठा क्रिमीनल आहे. त्याचेवर अनेक गुन्हे दाखल आहेत. राघवेंद्र आणि श्रीतेजा या केसमध्ये फसले असुन त्यांना अटक झाल्यास त्यांना सहा–आठ महिने जामीन होणार नाही. दोघांना या केसमधुन काढावयाचे असल्यास तुम्हाला मला रूपये ३०,००,०००/– (रूपये तीस लाख) द्यावे लागतील. माझे पती राघवेंद्र यांनी येवढी रक्कम देणे शक्य नसल्याचे सांगितले. त्यानंतर सुमारे दोन तास आमच्यात चर्चा झाली व तडजोडीअंती श्री. पुराणिक यांनी रूपये १२,००,०००/– (रूपये बारा लाख) ची मागणी केली. पुराणिक यांनी मला असेही सांगितले की, तुम्ही मला आता रूपये ४,००,०००/– (रूपये चार लाख) आता आणुन द्या. मी तुमच्या पतीला सोडतो. उर्वरीत रूपये ८,००,०००/– (रूपये आठ लाख) आणुन दिल्यानंतर श्रीतेजा यास सोडतो असे सांगितले. श्री. पुराणिक यांनी मागणी केलेली रक्कम न दिल्यास ते माझ्या पतीला खोटया केसमध्ये अडकवतील या भितीपोटी नाईलाजास्तव मी नवी मुंबई येथे जावून रक्कमेची जुळवणी करून त्याच दिवशी सायंकाळी १८.०० वाजताचे सुमारास प्रॉपर्टी सेल क्राईम ब्रांच, भायखळा, मुंबई येथे जावुन पुराणिक साहेबांना रोख रक्कम रूपये ४,००,०००/– दिले व ती त्यांनी स्विकारली. त्यानंतर पुराणिक साहेबांनी आम्हाला सांगितले की, उर्वरीत रूपये ८,००,०००/– दिल्याशिवाय ते श्रीतेजा यास सोडणार नाहीत. म्हणुन मी व माझे पती राघवेंद्र आम्ही रात्रौ २०.३० वा. नवी मुंबई येथे घरी परतलो.

25/9/21

प्रॉपर्टी सेल, क्राईम ब्रांच, भायखळा, मुंबई येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. पुराणिक यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम रूपये ८,००,०००/- देण्याची इच्छा नसल्याने मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक २४/०९/२०२१ रोजी तक्रार देण्यासाठी गेले व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटुन त्यांना लेखी तक्रार दिली. माझ्या तक्रारीवर कारवाई करण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन पो.नि. अमोल शिंदे व स.पो.आ. संजू जॉन यांना नेमण्यात आले. त्यांनी दोन शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची माझेशी ओळख करून दिली. पो.नि. शिंदे यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून माझा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. शिंदे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि. शिंदे यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी माझ्या तक्रारीची आज रोजी पंचांसमक्ष प्रॉपर्टी सेल, क्राईम ब्रांच, भायखळा, मुंबई येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. नागेश पुराणिक यांचे कार्यालयात प्रत्यक्ष भेट घेवून पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून पडताळणी दरम्यान माझे टी शर्टच्या आतील बाजुस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून, त्यामध्ये होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पो.नि. शिंदे यांनी माझी पडताळणी/सापळा पथकाशी ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही ला.प्र.वि. कार्यालयातून माझी कार व दोन पोलीस वाहनाने पोलीस पथकासह निघून जिजामाता उद्यानच्या बाजुला, भायखळा, मुंबई येथे थांबलो. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून पो.नि. शिंदे स्वत:चे, माझे व दोन्ही पंचांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला, श्री. पुराणिक यांचे प्रॉपर्टी सेल, क्राईम ब्रांच भायखळा, मुंबई येथील कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून महिला अंमलदारकरवी माझे टी शर्टचे आतील बाजुस लावून पंच श्री. बोबडे यांचेसह पाठविले असता, मी प्रॉपर्टी सेल, क्राईम ब्रांच भायखळा, मुंबई कार्यालयात जावून श्री. पुराणिक यांची भेट घेतली. त्यावेळी मी श्री. पुराणिक यांचेसोबत श्रीतेजा यास सोडुन देण्याबाबत चर्चा केली त्यावेळी श्री. पुराणिक यांनी श्रीतेजा यास सोडुन देण्यासाठी माझ्याकडे रूपये ८,००,०००/- लाचेची मागणी करून त्यापैकी रूपये ४,००,०००/- आज रोजी स्विकारण्याचे मान्य करून लाचेची रक्कम लगेचच घेवून येणास सांगितले. त्यानंतर मी व पंच श्री. बोबडे असे कार्यालयाच्या बाहेर निघुन ठरल्याप्रमाणे पोलीस वाहनाजवळ परत आलो. पो.नि. शिंदे यांनी महिला अंमलदारकरवी डिजिटल व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून, डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत संभाषण पंचासमक्ष ऐकले. त्यामध्ये लोकसेवक श्री. पुराणिक यांनी पडताळणी दरम्यान लाचेची मागणी करून लाचेची रक्कम लगेचच घेवून येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाल्याने, पुढील सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला लोकसेवक श्री. पुराणिक यांना लाच म्हणुन देण्याकरता वापरावयाच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी माझेकडे दोन लाख रक्कम असल्याचे सांगुन माझे पर्समधील रक्कम रुपये २,००,०००/- (रूपये ५००/- दराच्या ४०० भारतीय चलनाच्या नोटा) पो.नि. शिंदे यांचेकडे दिल्या. त्या त्यांनी स्वत:चे ताब्यात घेवून सदर नोटांचे फोटो त्यांच्या मोबाईलमध्ये काढले व सदर नोटांना ॲन्थ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी महिला अंमलदाराकरवी माझी झडती घेतली व मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवून लोकसेवक श्री. पुराणीक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझ्या तोंडावर लावलेला मास्क काढुन डावा हात डोक्यावरून वारंवार फिरविणे असा पुर्व नियोजीत इशारा करावा, त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवकास रंगेहाथ पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पोलीस वाहनाचे वाहन चालक श्री. पाटील यांनी मला व पंचांना ॲथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस ॲथ्रासीन पावडर लावली व सदर रक्कमेतील प्रत्येकी १०० नोटांचे चार

बद्दल तयार करून सदरची रक्कम माझे पर्समध्ये ठेवली. पो.नि. शिंदे यांनी डिजिटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून महिला अमलदारकरवी माझे टी शर्टचे आतील लावून पंच श्री. बोबडे यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक श्री. पुराणीक यांचे प्रॉपर्टी सेल, क्राईम ब्रांच, भायखळा, मुंबई येथे पाठविले. माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी, लोकसेवक श्री. पुराणीक यांच्या कार्यालयात ते जेथे बसतात तेथे गेले व श्री. पुराणीक यांच्याशी श्रीतेजा यास सोडुन देण्यासंदर्भात बोलणी करीत असतानाच श्री. पुराणिक यांनी माझेकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केली असता मी माझ्या पर्समध्ये ठेवलेली अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रूपये २,००,०००/-(रू. ५००/- दराच्या ४०० भारतीय चलनी नोटा) उजव्या हाताने काढुन श्री. पुराणिक यांचेसमोर धरली असता ती, त्यांनी दोन्ही हातानी स्विकारून ती मोजली. त्यावेळी लोकसेवक श्री. पुराणीक यांनी मला मी तुला चार लाख रूपये घेवून येण्यास सांगितले होते हे तर फक्त दोनच लाख रूपये आहेत असे अर्वाच्च व मोठया आवाजात बोलून पुर्ण चार लाख रूपये घेवून ये अन्यथा ते श्रीतेजा यास अटक करेन, असे बोलून लाचेची रक्कम त्यांचे टेबलावरील माउस पॅडवर ठेवली. त्यावेळी मी त्यांना माझ्याकडे एवढेच रूपये असुन उर्वरीत रक्कम नंतर देते असे सांगुन मी सदर कार्यालयातुन बाहेर आल्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अशा रीतीने माझ्या तोंडावर लावलेला मास्क काढुन डावा हात डोक्यावरून वारंवार फिरवून ठरल्याप्रमाणे सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीसांनी तात्काळ श्री. पुराणिक यांच्या कार्यालयात जावून त्यांना पकडले व त्यांच्या टेबलावर ठेवलेली लाचेची रक्कम रूपये २,००,०००/- ताब्यात घेतली. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी महिला अमलदारकरवी मला लावलेला डिजिटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला व पुढील सापळा कारवाई केली.

तरी प्रॉपर्टी सेल, क्राईम ब्रांच, भायखळा, मुंबई येथे बी.एम.डब्ल्यु. वाहन चोरी संदर्भात दाखल गुन्हया संदर्भात पोलीस अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक श्री. पुराणिक यांनी माझे पती राघवेंद्र व मित्र श्रीतेजा यास दिनांक २१/०९/२०२१ रोजी ताब्यात घेतले होते. दिनांक २३/०९/२०२१ रोजी श्री. पुराणिक यांनी त्या दोघांवर कारवाई न करता सोडुन देण्यासाठी माझ्याकडे रूपये १२,००,०००/- (रूपये बारा लाख) ची मागणी करून रूपये ४,००,०००/- दिल्यावर पती राघवेंद्र यास सोडुन उर्वरीत रूपये ८,००,०००/- दिल्यानंतर श्रीतेजा यास सोडतो असे सांगितले. दिनांक २४/०९/२०२१ रोजी पडताळणीचे वेळी श्री. पुराणिक यानी श्रीतेजा यास सोडुन देण्यासाठी माझ्याकडे रूपये ८,००,०००/- लाचेची मागणी करून त्यापैकी रूपये ४,००,०००/- आज रोजी स्विकारण्याचे मान्य करून लाचेची रक्कम लगेचच घेवून येणास सांगितले. नमूद दिवशी प्रॉपर्टी सेल, क्राईम ब्रांच, भायखळा, मुंबई येथे श्री. पुराणिक यांनी माझेकडुन रूपये २,००,०००/- लाच म्हणुन स्विकारली त्यावेळी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी पंचांसह लावलेल्या सापळयात लाचेच्या रक्कमेसह नागेश अंबादास पुराणिक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, प्रॉपर्टी सेल, क्राईम ब्रांच, भायखळा, मुंबई यांना ताब्यात घेतले. लोकसेवक श्री. पुराणिक यांनी माझा मित्र याचेविरूध्द कोणतीही कारवाई न करता त्यास सोडुन देण्यासाठी माझ्याकडे लाचेची मागणी करून ती स्विकारली म्हणून माझी त्यांच्या विरूध्द तक्रार असून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होण्यास विनंती आहे.

माझे लोकसेवक श्री. नागेश पुराणिक यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून, ती मला हिंदीतुन समजावून सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

(signature) २५/०९/२०२१

( अमोल शिंदे )
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(signature) 25/9/21

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे तोंडी तक्रारीवरुन, पडताळणी सापळा पंचांना

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant आमंत्रित करणेकामी

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) —

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक —

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page

सदर तारीख, वेळ व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे पती व त्यांचे मित्राचे मालाला कस्टम, कुरिअर, गुन्हे शाखा, भायखळा, मुंबई येथील दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने कारवाई न करण्यासाठी यातील लोकसेवक आल्होसे ने स्वतःच्या आर्थिक गैरफायद्याकरीता मोबदला म्हणून फि. यांचेकडे प्रथम 12 लाख लाचेची मागणी करून पहिला हफ्ता म्हणून 4 लाख स्विकारले. त्यानंतर फि. यांनी दि. 24/09/2021 रोजी लाप्रवि, मुंबई येथे दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने पंचासमक्ष पडताळणी दरम्यान आल्होसे ने फि. कडे उर्वरीत 8 लाख लाचेची मागणी करून, सापळा कारवाई दरम्यान फि. कडून 2 लाख लाच स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणून आल्होसे विरुद्ध कलम 7 भ्र.प्र.अ. 1988 अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

अमोल बबन शिंदे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, मुंबई.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

**Action taken** : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No.......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. ..........

District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature] 25/9/21

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. [signature] 25/09/2021.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name अमोल बबन शिंदे.

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ..........

Posting ला.प्र.वि. मुंबई विभाग.

Code No. of I. O ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 25/09/2021

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report